## मनपाद्वारा प्लास्टीकने बनलेल्या वस्तुंचा पुर्ण वापर बंद करण्याबाबत जनजागृती

**अकोला :** शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत स्वच्छता ही सेवा पंधरवाडा राबवण्यिात येत आहे. या अनुषंगाने आज दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला महानगरपालिकेच्या पुर्व झोन अंतर्गत झोन अंतर्गत प्रतिबंधीत प्लास्टीकने बनलेल्या वस्तुंबाबत तपासणी करून शासनाने बंदी घातलेल्या एकल वापर प्लास्टीकने बनलेल्या वस्तूंचा वापर संपुर्णपणे बंद करणे तसेच घरात आणि प्रतिष्ठानात निघणारा ओला व सुका कचरा परिसरात इतरत्र न टाकता फक्त मनपाच्या कचरा घंटा मध्ये कचरा टाकणे बाबत जनजागृती करून जनता भाजी बाजार व जुने बस स्थानक परिसराची स्वच्छता करण्यात आली.तसेच पश्चिम झोन अंतर्गत असलेल्या मुख्य बाजार पेठ येथे आणि उत्तर झोन अंतर्गत प्रभाग क्रं. १ मधील पंचशील नगर, बौध्द विहार येथे तसेच दक्षिण झोन अंतर्गत सिंधी कॅम्प येथील भाजी मार्केट येथे शासनाने बंदी घातलेल्या एकल वापर प्लास्टीकने बनलेल्या वस्तूंचा वापर संपुर्णपणे बंद करणे तसेच घरात आणि प्रतिष्ठानात निघणारा ओला व सुका कचरा परिसरात इतरत्र न टाकता फक्त मनपाच्या कचरा घंटा मध्ये कचरा टाकणे बाबत जनजागृती करण्यात आली. सदर कार्यक्रम सहा.आयुक्त विठठल देवकते, देविदास निकाळजे, दिलीप जाधव, राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाला.

# दिल्लीतील कास्तकारांच्या ऐतिहासिक आंदोलन मुळेच सरकार प्रभावित :टीकैत





**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :** सरकार कास्तकारांना संपविण्याचा मार्गावर असून कॉर्पोरेट घराण्याच्या इशाऱ्यावर कार्य करीत आहे.मात्र संयुक्त किसान मोर्च्यांच्या वतीने तेरा महिने चाललेल्या शेतकरी आंदोलन मुळेच एमएसपीच्या तीन मागण्या पूर्ण होऊ शकल्या असून अजून असे रणशिंग फुंकले जाणार आहे.म्हणून आपल्या न्याय हक्कासाठी देशभरातील कास्तकारांनी एकसंघ होण्याचे आवाहन संयुक्त किसान मोर्चाचे नेते राकेश टीकैत यांनी केले. रामदास पेठ येथील मराठा मंडळच्या स्व नामदेवराव पोहरे सभागृहात किसान ब्रिगेडच्या वतीने शेतकरी लुटवापसी सभा संपन्न झाली.यात टीकैत मार्गदर्शन करीत होते.जेष्ठ कॉम्रेड अशोक ढवळे यांच्या अध्यक्षतेत संपन्न या संवाद सभेत किसान ब्रिग्रेडचे संस्थापक व जेष्ठ शेतकरी नेते व संयोजक प्रकाश पोहरे,प्रहार नेते बच्चुभाऊ कडु,रविकांत तुपकर,विश्वास उटगी, अजीत नवले, पुरूषोत्तम खेडेकर, अजय भगत, कोटेश्वरराव, विजय कृष्णन, प्रशांत गावंडे, पी. साईनाथ,गुरुमितसिह, रविंदरसिह,रुपाली पाटील,प्रदीप देशमुख आदी उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवर व शेतकरी नेत्यांचा किसान बिग्रेडच्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक किसान ब्रिग्रेडचे प्रदेशाध्यक्ष पुरूषोत्तम गावंडे यांनी करून या संयुक्त किसान मोर्चाची भूमिका मांडली. यावेळी देशभरातून आलेल्या कास्तकार नेत्यांनी केंद्र सरकारच्या कृषी धोरणावर कडाडून हल्ले चढवीत आगामी रणनीतीची माहिती सादर केली

यावेळी ज्येष्ठ शेतकरी नेते विजय कृष्णन यांनी आपले मनोगत सादर केले ते म्हणाले, विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आम्ही भेटलो. विदर्भातील कास्तकारांचे संकट अद्यापही कायम आहे. देशात मोदी सत्तेवर येताना कृषी क्षेत्राच्या कालबद्ध विकासासाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करून कृषी व शेतकऱ्यांना विकसित करण्याचा प्रयत्न करू असे सांगण्यात आले होते. मात्र या काळात ३ लाख ५० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे मोदी सरकारच्या अपयशाचे मोठे कारण असल्याचे त्यांनी सांगितले.प्रशांत गावंडे- नरेंद्र मोदी यांचे केंद्र सरकार मोजंबीकची डाळ आयात करून येथील कास्तकारांना आत्महत्या करायला भाग पाडत आहे. राज्याचे फडणवीस सरकार हे फसनवीस सरकार असून शेतीच्या नापिकीतुन अनेक गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहेत .शेती हा मुख्य प्रश्न झाला पाहिजे. कास्तकारी ही गुंतवणूक व्हायला पाहिजे. कापूस गिरणीपेक्षा कापसाला जास्त भाव मिळाला पाहिजे, याचा विचार करण्याची आज गरज आहे. जगात केवळ भारतातच ५२ प्रकारचे पिके घेतल्या जातात. म्हणून कृषी क्षेत्राला आता सावरण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगून २ ऑक्टोबर रोजी सोयाबीनला भाव मिळाला पाहिजे यासाठी सकाळी ११ वाजता आंदोलन आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच कृषी क्रांतीत मुस्लिम, दलित, अल्पसंख्यांक समाजाची टक्केवारी ही वाढली पाहिजे यावरही किसान मोर्चा ने लक्ष दिले पाहिजे.पी साईनाथ- ज्येष्ठ पत्रकार पी साईनाथ यांनी कास्तकार व कृषी क्षेत्राच्या भकासपणावर कटाक्ष टाकला. ते म्हणाले ५० वर्षांपूर्वी विदर्भातील कास्तकारांची परिस्थिती काय होती. याचा विचार झाला पाहिजे. त्यावेळी कापसाच्या एका क्विंटल मध्ये एक तोळा सोने आपण खरेदी करू शकत होतो. आजची परिस्थिती फार विदारक आहे. आज सोन्याला १ लाख १३ हजार रुपये भाव असून यात १८ क्विंटल कापूस विकावा लागणार आहे. विदर्भात ३ लाख पालक पैसा अभावी आपल्या अपत्याचे लग्न न करत असल्याचे विदारक उदाहरण त्यांनी यावेळी सादर केले.

## थोडक्यात

### तेल्हाऱ्यात महाराजा अग्रसेन जयंती उत्सवाला सुरुवात



**तेल्हारा :** अग्रवाल समाजाचे आराध्य अग्रकूल प्रवर्तक महाराजा अग्रसेन जयंती निमित्य आयोजित उत्सवाला आज ता १९ पासून स्थानिक भागवत मंगल कार्यालयात सुरुवात झाली यामध्ये विविध स्पर्धा कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती अग्रवाल समिती कडून देण्यात आली आहे. प्रभू श्रीरामचंद्राचे पुत्र कुश यांचे २६ वे वंशज तथा अग्रवाल समाजाचे आराध्य असलेले महाराजा अग्रसेन यांची जयंती अश्विन शूद्ध प्रतिपदेला दरवर्षी अग्रवाल समाजाकडून मोठ्या उत्साहात साजरी केली जाते दिनांक २२ सप्टेंबर सोमवार रोजी त्यांची जयंती असल्याने अग्रवाल समाज नवयुवक मंडळ, नवयुवती मंडळ व महिला मंडळाच्या वतीने आज ता १९ पासून चार दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यानंतर राणी सती मातेचे मंगलपाठ करण्यात आले याव्यतिरिक्त अग्रवाल समाजातील लहान मुलासोबतच महिला व युवकांसाठी वेगवेगळ्या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे तर दिनांक २२ सप्टेंबर रोजी वाद्यवृंदासह महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमेची रॅली शहरातून काढण्यात येईल अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

### कांदा उत्पादकांवर अन्याय

**तेल्हारा :** अनेक शेतकऱ्यांनी कांदा पिकावर भर दिला. मात्र त्यावरही अवकाळी पावसाची वक्रदृष्टी पडल्याने कांद्याचे पीक मातीमोल झाले. त्यामुळे कांद्याचा विमा काढलेल्या शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची मागणी केली. विमा कंपनी तथा कृषी विभाग, महसूल विभाग यांनी सर्व्हे केला मात्र अद्यापही शेतकऱ्यांचा खात्यात नुकसान भरपाईची रक्कम जमा झाली नाही. तालुक्यातील दहिगाव शिवारात मागील वर्षी अतिवृष्टी पाठोपाठ अवकाळी पावसाने देखील धुमाकूळ घातला. त्यामुळे अवकाळी पावसाच्या तडाख्यात हरभरा व कांदा उत्पादक शेतकरी सापडले मात्र शेतकऱ्यांनी पिकांना सुरक्षा कवच मिळावी म्हणून कांदा पिकाचा देखील विमा उतरविला होता. त्यामुळे अवकाळी पावसाने थैमान घालताच शेतकऱ्यांनी क्लेम करून सर्व्हे करण्याची मागणी केली.

## सुरक्षित आणि अधीकृत वीज जोडणी घेवूनच साजरा करा दुर्गोत्सव; महावितरण

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :** सोमवार पासून दुर्गोत्सवाला सुरूवात होत आहे. उत्सव काळात भक्तिभावाने उत्सहात सहभागी होत असलेल्या लाखो भाविकांच्या सुरक्षिततेसाठी दुर्गोत्सव मंडळांनी अधीकृत वीज जोडणी घेवूनच उत्सव साजरा करावा असे आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.महावितरणने सार्वजनिक उत्सव मंडळांसाठी तात्पुरती वीज जोडणी देण्याची व्यवस्था केली असून केवळ घरगुती दरात वीज जोडणी देण्यात येते.

उत्सवातील रोषणाई, आकर्षक देखावे, मंडप, महाप्रसाद आणि इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था फक्त अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घेतली पाहिजे. बेकायदेशीर आणि अनधिकृत वीज जोडण्यांमुळे शॉर्ट सर्किट किंवा इतर गंभीर अपघात होण्याचा धोका असतो. म्हणूनच, सुरक्षेशी कोणतीही तडजोड न करता अर्ज करताच मंडळांना तात्पुरती वीज जोडणी दिली जाईल. असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मंडपातील विजेचे वायरिंग अत्यंत व्यवस्थित आणि प्रमाणित असावे. मीटर केबिनमध्ये जाण्याची परवानगी केवळ अधिकृत आणि प्रशिक्षित व्यक्तीलाच द्या. वीज जोडण्यांसाठी नेहमी दर्जेदार वायर आणि स्विच वापरा. आपत्कालीन परिस्थितीत संपूर्ण मंडपाचा वीजपुरवठा एकाच स्विचने खंडित करण्याची सोय असावी. तुटलेल्या वायर जोडण्यासाठी केवळ दर्जेदार इन्सुलेशन टेपचाच वापर करा. मीटर आणि स्विच जवळचा रस्ता नेहमी मोकळा ठेवावा, जेणेकरून गरज पडल्यास त्वरित पोहोचता येईल. मंजूर झालेल्या भारापेक्षा मंडपातील विजेचा वापर जास्त होणार नाही याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

आणीबाणीच्या परिस्थितीत त्वरित मदतीसाठी महावितरणने २४ तास उपलब्ध असलेले टोल-फ्री क्रमांक दिले आहेत, १९१२, १८००-२३३-३४३५. १८००-२१२-३४३५ किंवा ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस कॉल देऊनही संपर्क साधू शकता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक महावितरण अभियंता आणि 'जनमित्रांचे' मोबाईल क्रमांक जवळ ठेवावे, असं आवाहनही करण्यात आलं आहे.

तात्पुरत्या वीज जोडणीसाठी मंडळांना त्यांच्या मंजूर वीजभाराप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल. ही रक्कम ऑनलाईन भरल्यास, उत्सव संपल्यानंतर वीजबिलाची रक्कम वजा करून उरलेली रक्कम विनाविलंब परत केली जाईल. यामुळे रक्कम परत मिळवण्यासाठी वाट पाहावी लागणार नाही. आणि मंडळाची प्रक्रिया अधिक सुलभ होईल.

## रेल्वे स्थानक परिसरात ऑटोरिक्षांना शिस्त लागणार

### पोलीस अधिक्षक यांनी घेतली दखल

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :** रेल्वे स्थानकात ये जा करणा-या प्रवाशांची बेशिस्त वाहनांमुळे गैरसोय होत होती. कोणाला तातडीने तिकीट काढायचे तर कोणाला फलाटात उभी गाडी पकडायची. परंतु त्यात अडथळा असतो तो दोन्ही प्रवेश द्वारांवर उभ्या ऑटोरिक्षांचा. हा अडसर आता दूर होणार आहे.



एसपींनी समस्येची दखल घेऊन निर्देश दिल्याचे कळते. विशेष म्हणजे या परिसरात वन वे करण्यात येणार आहे. त्यामुळे अंधाधुंदीला लगाम लागेल. ऑटोरिक्षांना हद्द आखून देणे आवश्यक आहे. तसेच नियमांचा भंग करणाऱ्या चालकांविरुद्ध कडक कारवाई करावी लागेल. त्यासाठी दुसरा पर्याय नाही. मध्यंतरी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी रेल्वेस्थानकातील पार्किंग ची पाहणी केली होती. तसेच संबंधितांना सूचना दिल्या होत्या. परंतु तरीही ऑटो चालकांची मनमर्जी सुरू दिसते. त्याला त्वरित आळा घालणे गरजेचे आहे. कारण प्रवाशांच्या हिताला तिलांजली देऊन रेल्वे स्थानकातील दोन्ही गेट समोर वाहने उभे करणे अयोग्य आहे. याचा बंदोबस्त जितका लवकर होईल तितके प्रवासी हिताचे.

## राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा शिबीरांद्वारे जात पडताळणी त्रृटींचे निराकरण

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :** जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अकोला या कार्यालयाचे वतीने राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त २२, २३, २४ व २९ सप्टेंबर रोजी जात पडताळणी त्रृटी शिबिरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती येथे राबविण्यात येत आहे.

सामायिक परिक्षेनंतर उच्च शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित करण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यानुसार इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील नविन प्रवेशित विद्यार्थी यांनी अद्याप पर्यंतही जात वैधता प्रमाणपत्र मिळिवण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आले नाहीत अशा विद्यार्थ्यांकरीता या कार्यालयात अर्ज स्विकृतीसाठी विशेष खिडकीचे नियोजन करण्यात आले आहे.

जेणेकरून पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यापासून कुठल्याही प्रकारचा विद्यार्थी विद्यार्थीनी वंचित राहणार नाही. महाविद्यालयात ११ वी १२ वी विज्ञान शाखेत प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने मिळण्याकरीता प्रस्ताव स्विकारण्यात येत आहे. तसेच महाविद्यालातील प्राचार्य यांना समान संधी शिबीर आयोजित करून जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी आवश्यक लागणाऱ्या शैक्षणिक व जाती विषयक महसूली पुरावे प्रस्तावासोबत जोडण्याकरीता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात यावे.

त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच इयत्ता ११ वी १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना त्रृटी अभावी प्रलंबित असलेल्या प्रकरणाची पुर्तता करण्यासाठी या कार्यालयाकडून ईमेल, एसएमएस व पत्राव्दारे कळिवण्यात आले आहे. जेणेकरून पुर्तता करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयाकडून वितरित करणे सोयीचे होईल. तसेच पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता कुठलाही विद्यार्थी वंचित राहणार नाही. सदर शिबिराचा विद्यार्थी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घेण्यात यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणीचे उपायुक्त तथा सदस्य यांनी केले आहे.

## शासकीय पाईप चोरी प्रकरणी आरोपीचा अटकपूर्व जमानत अर्ज न्यायालयाने फेटाळला

**▪अकोट,दि १९ (प्रतिनिधी) :** अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी आरोपी जाबीर खान नसोरोद्दीन रा. नांगला बनजीयका राजस्थान याने अंजनगाव रोडवरील दिवठाणा फाटयाजवळ पाणीपुरवठा विभागाचे ६ लाख ४८ हजार रुपये किमतीचे ५४ पाईप चोरले होते. या प्रकरणात दाखल केलेला अटकपूर्व जमानत अर्ज अकोट सत्र न्यायालयाने नामंजूर केला आहे.या प्रकरणात आरोपी ०९.०४.२०२५ पासून फरार आहे. सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करतांना न्यायालयात लेखी उत्तर व युक्तीवाद सादर केला की, या प्रकरणातील फिर्यादी पोलीस शिपाई गिरधर बौहान अकोट यांनी ०९.०४.२५ रोजी या प्रकरणात फिर्यादी दिली की, ०८.०४.२५ चे रात्री पेट्रोलिंग करतांना दिवठाणा रोडवर आम्हाला ट्रक दिसला. ट्रकजवळ काही इसम रोडच्या कडेला असलेले पाईप ट्रक मधे भरत होते. पोलीसांना पाहून ट्रक चालक व इतर पळून गेले. हा ट्रक पोलीस स्टेशनला आणून जमा केला. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. ग्रामीण चे पोलीस निरीक्षक जुनगरे व ए.एस.आय दादाराव निखार यांनी तपास करुन जीवन प्राधिकरण उपविभाग अकोट यांचे अधिका-याकडून पाईप संबधी लेखी पत्र घेतले. त्यानंतर अर्जदार आरोपीने जप्त केलेला ट्रक सुपुर्तनाम्यावर मिळण्याकरीता २०.०५.२५ रोजी स्वतःच्या नावाने व १०.७.२५ रोजी मुखत्याराच्या नावे अर्ज दाखल केला.

## 'माविम'च्या भगिनीकडून मसुरीत आयएएस प्रशिक्षणार्थ्यांना धडे

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :** महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अकोला लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक सोनाली अंबरते यांनी मसुरी येथे नुकतेच नवनियुक्त आयएएस अधिका-यांना बचत गटांचे कार्य, प्रत्यक्ष फिल्डवरचा अनुभव याबाबत प्रशिक्षण दिले.

मसुरी येथील लालबहादूर शास्त्री प्रशासकीय प्रशिक्षण अकादमी येथे भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रवेशानंतर अधिका-यांचे प्रशिक्षण पूर्ण होते. अकोला येथील लोकसंचालित साधनाचे कार्य, स्वबळावर निर्माण केलेली इमारत, स्वयंसहायता गटांचे जाळे आदी लक्षात घेऊन 'माविम'च्या व्यवस्थापकीय संचालक राजलक्ष्मी शहा, तसेच प्रशासकीय अकादमीचे अधिकारी



शैलेश नवाल यांच्या मार्गदर्शनात अकोला केंद्राच्या व्यवस्थापक सोनाली अंबरते यांची प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली.

त्यानुसार गेल्या आठवड्यात श्रीमती अंबरते यांनी मसुरी येथे जाऊन 'स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाची चळवळ' या विषयावर प्रशिक्षण दिले. एका गटाच्या संस्थाचालक ते स्वतःची इमारत शासनाचा निधी न घेता उभारणे, शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना, पतसंस्था असा प्रवास त्यांनी आपल्या व्याख्यानातून उलगडला. 'माविम'च्या जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी मार्गदर्शन केले.

## खिडकीपुरा, दहिहांडा बेस येथील अवैध अतिक्रमणावर कार्यवाही करा

### नागरीकांची जिल्हा पोलीस अधीक्षक व मनपा आयुक्तांकडे मागणी

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :** खिडकीपुरा, दहिहांडा बेस, भाजी बाजार परिसरामध्ये रहिमखाँ करीमखाँ व इमरानखाँ रहीमखाँ या दोन्ही गुंड प्रवृत्तीच्या बापलेकांनी महानगरपालिकेच्या मालकीच्या २० हजार स्क्वेअर फुट खुल्या जागेवर टिनशेड कॉलम टाकून अतिक्रमण केले आहे. या टिनाच्या शेडमध्ये तो खुलेआम गांजा विक्रीचा व्यवसाय, वरली मटका, ५२ पत्ते, रम्मी व इतर अवैध धंदे करण्यासाठी ह्या खुल्या भुखंडाचा वापर करुन दिवसेंदिवस या परिसरातील सरकारी जमिन गिळंकृत करुन त्या जागेवर अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात करण्याचा सपाटा लावला आहे. याविषयी त्याला परिसरातील कोणत्याही नागरीकाने हटकले असता तो त्या नागरीकाला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन मारण्याचा प्रयत्न करीत आहे. अतिक्रमणकर्ता रहीमखाँ करीमखाँ याच्यावर अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याचा मुलगा इम्रानखॉ रहीमखाँ हा एन.पी.डी. मधून शिक्षा भोगून नुकताच बाहेर आल्यापासून कोणालाही मारहान करतो आहे व कुणालाही जुमानत नाही. याचे सुरु असलेले सर्व अवैध धंदे त्वरीत बंद करुन या



दोन्ही बापलेकाचा बंदोबस्त करावा. जागेसंबंधीची सर्व कागदपत्रे निवेदनासोबत जोडली असून सदर अतिक्रमण जागा शासनाने खाली करुन घेवून शासनाच्या ताब्यात घ्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे परिसरातील नागरीकांनी केली आहे. निवेदनावर सैय्यद जफर, सैय्यद मोहसीन, अब्दुल रनी, फैसल खान, फिरोज खान, जरीनोद्दीन, नाजीम खान, सलमान खान, अमजद खान, सैयद जफर, शब्बीरोद्दीन, इम्रान बेग, सय्यद फरवोद्दीन, इरफान बेग, मो. शकील, मुशर्रफ अली, सै. खुरेका, अवैस, सै. शाहरुख, आ बीर, जकी खान, मोहम्मद साकीब, मोहम्मद खिजर, तारीक अली, अब्दुल मोईन, मोहम्मद इमरान, इदरीस मिस्त्री, इजहान खान, अली खान, अदनान हुसेन, शे. मोन, रियाझ खान, अबरार, शोएब कान, काफिल, सैय्यद जुबेर, शे. शफी, शे. अय्युब, इम्रान खान, मो. जिशान आदी नागरीकांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## नियमित व्यायाम व सकस आहार ही सुदृढ आरोग्याची गुरुकिल्ली

### मनुताई कन्या शाळा व मारवाडी युवा मंचच्या संयुक्त उपक्रमांतर्गत

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :** सुदृढ आरोग्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि शारीरिक स्वच्छता यांचे पालन अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सौ. भारती राठी यांनी केले.

त्या मनुताई कन्या शाळा, अकोला आणि अखिल भारतीय मारवाडी युवा मंच, मिड टाउन शाखा, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ सप्टेंबर २०२५, बुधवार रोजी आयोजित किशोरवयीन विद्यार्थिनींसाठीच्या आरोग्य विषयक उद्बोधन कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. ऐश्वर्या धारस्कर, पर्यवेक्षिका श्रीमती मांगे मॅडम तसेच अन्य शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शारदा देवीच्या प्रतिमेला हार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. राठी मॅडम यांनी प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी, महिला आरोग्याशी संबंधित सामान्य समस्या आणि त्यावर योग्य उपाययोजना या विषयांवर सखोल व सुलभ मार्गदर्शन केले.

महासागर

अकोला

पान ६

●शनिवार,दि.२० सप्टेंबर २०२५

## राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचा दौरा

**अकोला** : वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे उद्या २० सप्टेंबर रोजी अकोला येथे येत आहेत.त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : सकाळी १०.१५ वाजता अकोला विमानतळ येथे आगमन व त्यानंतर सकाळी १०.३० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे आगमन, सकाळी ११ वाजता शिवार फेरी शुभारंभ कार्यक्रमास उपस्थिती, दु १,३५ वा विद्यापीठ विश्रामगृह येथे राखीव, दुपारी २.३० वाजता नागपूरकडे रवाना.

# ५ प्रतिनिधिचे आमरण उपोषणामधील तिघांची तब्येत बिघडली




■अकोला,दि १९ (प्रतिनिधी) : राज्य सरकारने हैद्राबाद गेझिटियर लागू करून मराठा समाजाला ओबीसी समाज आरक्षणात घुसखोरी सुरु केली आहे आणि हा प्रकार ओबीसी समाजावर अन्याय करणारा आहे. याला थांबवीण्यासाठी ओबीसी समाजाच्या वतीने सोमवार १५ सप्टेंबरपासुन जनार्दन हिरळकर, शंकर बापूरावं पारेकर, पुष्पाताई गुलवाडे, राजेश माणिकराव ढोमणे, ऍड. भाऊसाहेब विठ्ठलराव मेडशिकर या पाच प्रतिनिधिनी अकोला जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण सुरु केले असून चवथ्या दिवशी यातील उपोषणकर्ते राजेश माणिकराव ढोमणे,जनार्दन हिरळकर, शंकर बापूरावं पारेकर यां तिघांची प्रकृती खालवली आहे. तर यातील राजेश माणिकराव ढोमणे यांना रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. आज पाचव्या दिवशी वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ऍड. बाळासाहेब आंबेडकर यांनी आमरण उपोषण मंडपाला भेट दिली आणि उपोषणकर्ते यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यांचवेळी वंचित बहुजन आघाडी ओबीसी सोबतच असल्याचे सांगितले.ओबीसी समाजाला धैर्य देण्यासाठी कायदेशीर मार्गाने ओबीसी समाजात येणाऱ्या ओढ सुरु आहे.

- एकाला केले रुग्णालयात भरती
- आज पाचव्या दिवशी ऍड. बाळासाहेब आंबेडकरांनी दिली भेट
- वंचित बहुजन आघाडी ओबीसी सोबतच

**पुढील नियोजनासाठी आयोजन समितीचे पदाधिकारी माजी आमदार हरिदास भदे यांच्या निवास स्थानी एकत्र बसून आंदोलनाची पुढील दिशा ठरवित आहेत यामध्ये माजी आमदार हरिदास भदे, माजी आमदार बळीराम सिरस्कार, माजी आम. नारायण गव्हाणकर, प्रा. डॉ संतोष हुशे, विजय कौशल, अमोल पाथरकार, आत्मराम म्हात्रे,परशराम बंड,श्रीकांत ढगे कर, संतोष सरोदे, गोविंद इंगोले, सुभाष सातवं आदिचा समावेश आहे.**

# नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान पंधरवड्याला सुरुवात

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी) : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबरपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' महाराष्ट्रभर सुरू झाले आहे. महात्मा गांधी जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) चालणाऱ्या या भव्य उपक्रमांतर्गत राज्यात १० लाखांहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अकोला जिल्ह्यातही अभियानाला सुरूवात झाली असून, पहिल्या दोन दिवसांतच ५३ शस्त्रक्रिया आणि सुमारे पाचशे तपासण्या झाल्या आहेत.संपूर्ण राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या भव्य उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्नशील आहेत.राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ मिळत आहे. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत.या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्रतज्ज्ञ रुग्णालये व विविध सामाजिक संस्था सक्रिय सहभाग नोंदवत आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी ठरत आहे.नेत्ररोग उपचाराचा खर्च गोर-गरीब नागरिकांना परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरत आहेत. वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिकांना उपचाराची संधी या उपक्रमातून उपलब्ध होत आहे.

# अकोला जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धा २०२५ चा समारोप



■अकोला,दि १९ (प्रतिनिधी) : दिनांक १७.०९.२०२५ ते दिनांक १९.०९.२०२५ या कालावधीमध्ये श्री. अर्चित चांडक पोलीस अधीक्षक, अकोला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस मुख्यालय अकोला येथेअकोला जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धा २०२५ आयोजीत करण्यात आले होती. त्याचा आज समारोप समारंभ चे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १९.०९.२०२५ रोजी दुपारी ०४.३० वा पोलीस मुख्यालय येथे क्रीडा समारोप समारंभाचे करण्यात आले होते. सदर कार्यक्रमा करीता प्रमुख अतिथी श्री अर्चित चांडक पोलीस अधीक्षक, अकोला, श्री चंद्रकांत रेड्डी अपर पोलीस अधीक्षक, अकोला विशेष अतिथी बॉक्सींग खेडाळु राज्य पुरस्कार प्राप्त श्री हरिवंश टावरी, याची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांना मानवंदनाने व स्वागताने करण्यात आली, त्या नंतर उपस्थीत मान्यवरांच्या समोर १४ वर्षा आतील लहान मुलां करिता ५० मीटरधावण्याची स्पर्धा, १०० मीटर धावण्याची स्पर्धा, अधीकारी रस्सीखेच स्पर्धा, तसेच महीला करीता संगीत खुर्ची स्पर्धा चे आयोजन करण्यात आले. त्यानंतर सर्व अकोला पोलीस दलातील खेडाजुंनी शिस्तबध्द संघ संचालन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते जनरल चाम्पियनशिप पोलीस मुख्यालय व स्पर्धेतील सांघिक खेळातील विजेते पोलीस मुख्यालय व शहर विभाग उपविजेते संघाला तसेच वैयक्तीक बक्षीसे देवुन सन्मानीत करण्यात आले.

श्री हरिवंश टावरी, यांनी आपले मनोगतात अकोला जिल्हा पोलीस दलामध्ये आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेचा समारोप समारंभ पाहून मला अत्यंत समाधान वाटते आहे. पोलीस दल हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारे यंत्र नसून समाजात सकारात्मक ऊर्जा व प्रेरणा देणारे आदर्श स्तंभ आहेत. खेळामुळे शरीरात चैतन्य, मनात आनंद आणि कार्यात नवचैतन्य निर्माण होते. अकोला पोलीस दलातील खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, संघटित कार्य आणि क्रीडाभावना पाहून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने होत राहावेत ही अपेक्षा आहे. आज ज्यांनी पारितोषिके मिळवली त्यांचे अभिनंदन करते, तसेच सर्व सहभागी खेळाडूंना शुभेच्छा देते. अशा स्पर्धामुळे पोलीस दलाची तंदुरुस्ती आणि बांधिलकी निश्चितच अधिक मजबूत होईल असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांनी अकोला जिल्हा पोलीस दलातील सर्व अधिकारी व जवानांनी तीन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धेत दाखवलेला उत्साह, शिस्त व खेळाडूवृत्ती पाहून मला अतिशय आनंद होत आहे. पोलीस दलाचे काम हे जबाबदारीचे, कष्टाचे आणि वेळोवेळी आव्हानात्मक असते. अशा वेळी अशा क्रीडा उपक्रमांमुळे आपल्याला शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक उत्साह आणि संघभावना वाढीस लागते. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंनी खर्या अर्थाने क्रीडाभावना जपली आहे. विजेतेपद मिळवणे ही गौरवाची बाब आहे.

## चालक दिनानिमित्त चालकांचा गौरव !

**अकोला** : सप्टेंबर हा दिवस चालक दिन असल्याने प्रादेशिक परिवहनअधिकारी रविंद्र भुयार तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी मो. समीर मो. याकूब यांच्या मार्गदर्शनाखाली चालक दिनानिमित्त त्यांच्याकार्यालयातील सर्व चालक तसेच राज्य परिवहन महामंडळाचे चालकाचा सन्मान करण्यात आला.

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आयोटी या विषयावर कार्यशाळेचे आयोजन



■अकोट,दि १९ (प्रतिनिधी) : श्री शिवाजी महाविद्यालय अकोट आणि अमरावती नॅचरलसब यांच्या संयुक्त विद्यमाने कृषीतील नवे युग: कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आयोटी या विषयावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. केशवराव मेतकर, उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, उद्घाटक ऍड.गजाननराव पुंडकर, उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, प्रमुख व्याख्याते डॉ. भुषण गोसावी, सीनियर ऍग्रोनॉमिस्ट, प्रमुख अतिथी श्री. सुरेशदादा खोटरे, सदस्य कार्यकारी परिषद श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तर श्री. अभिजीत देशमुख, संचालक अमरावती नॅचरलसब, एल.एम.सी. सदस्य श्री. पंजाबराव शिरसाठ, ऍड. मनोजभाऊ खंडारे, सीडीसी सदस्य, श्री. दादाराव यवतकार, श्री. गजाननराव गणगणे, श्री. बाळासाहेब अरबट, श्री. अनिल चांदेकर, श्री. जयदेवराव साबळे, श्री. प्रशांत पाचडे, श्री. पाचडे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ संजय कोल्हे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. माणिक ढोरे हे मान्यवर उपस्थित होते. प्रमुख व्याख्याते डॉ. भुषण गोसावी यांनी त्यांच्या मॅप माय क्रॉप या कंपनीद्वारे शेतकऱ्यांना कृषी संबधित कृत्रिम बुद्धिमत्ता, सॅटेलाईट इमेजरी, आणि डेटा आधारित मॉनिटरिंग या विविध सेवांची उपयुक्त माहिती दिली आणि त्याचा वापर शेतीचे संरक्षण करण्याकरिता करावा अशी आशा व्यक्त केली. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे निराकरण त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अश्विनी फोकमारे व आभार प्रदर्शन डॉ. नूतनवर्षा देशमुख यांनी केले.

# अखेर त्या ठेकेदारावर पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

## पत्रकाराला गंभीर धमक्या, अश्लील शिवीगाळ प्रकरणाचा तपास आयपीएस अधिकाऱ्याकडे

■हिवरखेड, दि. १९ (प्रतिनिधी) : हिवरखेड येथील प्रामाणिकपणे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकाराला वारंवार गंभीर स्वरूपाच्या धमक्या देणे आणि अत्यंत आक्रमकपणे अश्लील शिवीगाळ प्रकरणी राजेश देशमुख या मुजोर ठेकेदारावर पत्रकार संरक्षण कायद्यासह विविध गंभीर स्वरूपाच्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून थेट आयपीएस अधिकारी निखिल पाटील या प्रकरणाचा तपास करणार आहेत. अकोट-तेल्हारा उपविभागा अंतर्गत आणि हिवरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत हा पहिलाच गुन्हा असल्याची चर्चा आहे. अकोट हिवरखेड जळगाव जामोद राज्य मार्गावर राजेश देशमुख या ठेकेदाराने हिवरखेड आणि खंडाळा फाटा नजीक अश्या दोन पुलाचे काम घेतले होते. परंतु दिलेल्या कालावधीत त्याने पुलाचे काम पूर्ण केलेच नाही याउलट मुदत वाढ देऊन सुद्धा त्याला पुलाचे काम पूर्ण करता आले नाही. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड नरक यातना भोगाव्या लागत होत्या. त्यासाठी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणाऱ्या पत्रकाराला वारंवार अश्लील शिवीगाळ करणे, पुलाच्या साईटवर बोलावून पुलाच्या निकृष्ट कामाचे फोटो व्हिडिओ काढल्यास तसेच वृत्त प्रकाशित केलास हात, पाय तोडण्यासह पत्रकाराला त्याच्या संपूर्ण कुटुंबासह जिवे मारण्यासह, खोट्या गुन्ह्यात अडकवून टाकीन,असे अत्यंत आक्रमकपणे धमकावले. सदर ठेकेदाराने एक वेळा प्रत्यक्ष आणि फोनवर अनेक वेळा गंभीर धमक्या दिल्या व अश्लील शिवीगाळ केली. त्यामुळे पत्रकार व त्याचे कुटुंबीयांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. सदर पत्रकाराने ठेकेदार राजेश देशमुख यांच्याविरुद्ध हिवरखेड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून त्याच्यावर आता पत्रकार संरक्षण कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ज्यामध्ये २९६, ३५१(२) इछड मध्ये. कलम ३५१(३) इछड व महाराष्ट्र प्रसारमाध्यमातील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्य व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी) प्रतिबंध अधिनियम २०१७ चे कलम ३ व ४ कलम यांचा समावेश आहे.

पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत ठेकेदार राजेश देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याने आता या प्रकरणाचा तपास आयपीएस अधिकारी निखिल पाटील करणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. तसेच हिवरखेड ठाणेदार गजानन राठोड, पोलीस उपनिरीक्षक गोपाल गिलबिले, श्रीराम जाधव यांच्यासह पोलीस स्टाफ सहकार्य करीत आहेत.

## कचरा घंटा गाडीचे वापर करणे बाबत जनजागृती

■अकोला,दि १९ (प्रतिनिधी) : शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत स्वच्छता ही सेवा पंधरवाडा स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छताङ्ग उपक्रम राबवण्यिात येत आहे. या अनुषंगाने आज दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला महानगरपालिकेच्या पुर्व झोन अंतर्गत झोन कार्यालय प्रभाग क्रं. ३, ४, ५, ६, १२ आणि १३ मध्ये तसेच पश्चिम झोन अंतर्गत नदी काठ लगतच्या ईदगाह व गणपती विसर्जन घाटा जवळील भागांमध्ये तसेच उत्तर झोन अंतर्गत नांयगांव येथील मनपा शाळा क्रं. ७ लगतच्या भागामध्ये तसेच दक्षिण झोन अंतर्गत परिसरात नागरिकांना कचरा घंटा गाडीचे वापर करून घरात आणि प्रतिष्ठानात निघणारा ओला व सुका कचरा वेग-वेगळा गोळा करून परिसरात नदीत किंवा नाल्यात न टाकता फक्त कचरा घंटा गाडी मध्येच कचरा टाकण्यासाठी जनजागृती करण्यात आली.

# मुख्यंमत्र्याची लाडकी बहीण समस्या निवारण शिबिर



■अकोला,दि १९ (प्रतिनिधी) : येथे माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे वाढदिवसाचे औचित्य साधत व सेवा पंधरवाढा अभियांना अतर्गत हिवरखेड मंडळ मधे भारतीय जनता पक्षाचे वतीने मूख्यमंत्री लाडकी बहीन योजने मधे ज्या महिलांचे चार ते पाच महिन्यापासून पैसे आले नाहीत त्यासाठी शीबीर आयोजन केले असून या कार्यक्रमाचे ऊदघाटन माजी जि परीषद सदस्य सूलभा रमेश दुंतोडे पंचायत समिती सदस्य गोकुळा महेंद्र भोपळे माजी सरपंच प्रतिभा वीरेंद्र येऊल वैशाली गणेश वानखडे माजी सरपंच सौ शिल्पा मिलिंद भोपळे उज्वला नेरकर विमल सेदानी प्रमिला मानकर दिपाली इंगळे उज्वला येऊल निर्मला नाठे विजया कराळे ग्रामपंचायत सदस्य अनिता रवी वाकोडे या योजनेचे सदस्य महेद्र भोपळे, तसेच अनिल कराळे कीरण सेदाणी संदीप ईगळे दिलीप नाठे, प्रविण येऊल महेद्र कराळे,अजिजखॉ विनोद ढबाले,एकनाथ भोपळे बंजरग तिडके, अन्सारोद्धीन,सैय्यद अजहर,गणेश वानखडे रवि वाकोडे प्रथमेष नाठे रवी मानकर संजय हिवराळे, मोहसिनभाई, या व साकीब बाळासाहेब नेरकर यांचे ऊपस्थीतीत सपन्न झाले.

## कला शिक्षकांची नवीन पदे भरण्याची मागणी

**अकोला :** कला शिक्षकांसाठी नवीन पदे भरण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाकडून होत आहे. भरतीबाबत महामंडळाने शिक्षण मंत्री दादा भुसे यांना काही दिवसांपूर्वी निवेदनही दिले होते. पद निर्मिती प्रक्रिया सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही शिक्षण मंत्री यांनी जिल्ह्यातील कला शिक्षकांनी दिली होती. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना आवडत्या विषयाचे कला शिक्षक केव्हा मिळेल.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From-
**PRITI RAJIV SONI**
- TO
**PREETI RAJIV SONI**
PASSPORT NO :-
**M5824108**
My Residential Address is - Shree Ramkrupa Soni Colony Ratanlal plot Akola 444001

# अग्रसेन जयंती सप्ताहाची गणेशपूजन व महाआरतीने प्रारंभ



■अकोला,दि १९ (प्रतिनिधी) : संपूर्ण अग्रवाल समाजाला आदर असलेले महाराजा अग्रसेन यांच्या जयंती सप्ताहाची सुरुवात बुधवारी स्थानिक अग्रसेन भवनात गणेशपूजन आणि महाआरतीने झाली. संपूर्ण अग्रवाल समाज २२ सप्टेंबर रोजी महाराजा अग्रसेन यांची जयंती साजरी करत आहे. अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयनका यांच्या अध्यक्षतेत स्थानिक अग्रसेन भवनात संपन्न झालेल्या या अग्रसेन जयंती सप्ताहाच्या उद्घाटन समारंभात यजमान श्रीमती सुशीलादेवी भिकूलाल गोयनका, उत्सव गोयनका, किरण व संजय तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक रमाकांत खेतान, शिवकुमार रुहाटीया,वसंत बाछुका, कमलकिशोर अग्रवाल,डॉ. के.के. अग्रवाल, रामलाल अग्रवाल, डॉ.ओमप्रकाश बगडे, श्रीकिशन अग्रवाल गंगासहाय, नवल किशोर सराफ, अरुण पाडिया, श्रीकिशन गोयनका,राजेंद्र पोदार,रमेश टेकडीवाल, ऍड सुरेश अग्रवाल गुरुजी, पवन गुप्ता, डॉ.पूजा खेतान, महिला मंडळाच्या अध्यक्षा निशा लोहिया, नवयुवक मंडळाचे अध्यक्ष केशव अग्रवाल, नवयुवती मंडळाच्या अध्यक्षा राधिका अग्रवाल आदी उपस्थित होते.

मान्यवरांनी पूजा अर्चना करून महाआरतीमध्ये भाग घेतला व उपस्थित समाज बांधवांना अग्रसेन जयंती उत्सवाच्या शुभेच्छा दिल्यात. समितीतर्फे २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:३० वाजता खामगाव रोडवरील तुषार सेलिब्रेशन येथे सर्व नागरिकांसाठी मोफत भव्य राष्ट्रीय कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये ग्वाल्हेर येथील आंतरराष्ट्रीय व्यंगचित्रकार तेज नारायण शर्मा, धार येथील विनोदी कवी जानी बैरागी, जयपूर येथील वीर कवी अशोक चरण,निजामाबाद येथील विनोदी कवी मनोज मद्रासी, नरसिंगपूर येथील गझल गायिका रश्मी किरण आणि अमरावती येथील किरण जोशी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे.

## नवरात्रीनिमित्त भाविकांसाठी विशेष बस सेवेचे नियोजन

**अकोट :** अकोट आगाराच्या वतीने दिनांक २२/९ / २५ पासून खास भाविकांकरिता बस सेवा सुरू करण्यात येणार आहे, आकोट ते मुऱ्हा देवी, अंबादेवी अमरावती, ढगा देवी कुरणखेड व परत अकोट अशी बस सेवा सुरू करण्यात येत असून सदर मार्गावर तीन देवींचे दर्शन होत असून या बसचे पूर्ण प्रवास भाडे अकोट पासून ते परत अकोट येईपर्यंत ४५३ रुपये असून लहान मुले, ६५ वर्षांवरील जेष्ठ नागरिक व महिलांकरिता २२७ रुपये व ७५ वरील जेष्ठ नागरिकांकरिता मोफत राहणार आहे सदर बस ची वेळ ही सकाळी ०९.००वाजता राहणार असून सकाळी ०५०० वाजता अकोट ते माहूर फेरीचे देखील नियोजन करण्यात आलेले आहे

**Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola 444104**
**Department of Soil Science**

**Walk in Interview**

**Walk in Interview** for one post of **Project Assistant** in SML Project and one post of **Young Professional I** in RF-Micronutrients. purely on temporary and contractual basis is scheduled on **23/09/2025** at 10.00 am in the office of Head, Department of Soil Science, Dr. PDKV, Akola. The other details are available on website **www.pdkv.ac.in**

**Sd/- Head,**
**Dept. of Soil Science**
Dr. PDKV, Akola

क्र./विमाका/अम/जाही/४८९

RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

